# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 23.08.2025** **वार- शनिवार**

---

### गोवर

राज्यातील बालकांना गोवर रुबेला लसीची पहिली आणि दुसरी मात्रा मिळून 4लाख 64 हजार मात्रा देण्यात आल्या आहेत. कोरोना काळात गोवर रुबेला लसीकरण कमी झालं होतं. गोवरच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर लसीकरणावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना आरोग्य विभागाला देण्यात आल्या होत्या. त्यानुसार एप्रिल 2024 ते मार्च 2025 या वर्षात लसीकरणाचं 100 टक्के उद्दिष्ट गाठण्यात आलं असून नवीन वर्षातील लसीकरणाचा पहिला टप्पाही पूर्ण करण्यात आला असल्याची माहिती राज्य लसीकरण अधिकारी डॉक्टर प्रवीण वेदपाठक यांनी दिली आहे.

### खत

कृषी विभागानं किरकोळ रासायनिक खत विक्रेत्यांना अनुदानित रासायनिक खतांची विक्री ही 'ई-पॉस' यंत्रांच्या माध्यमातून करण्यास सांगितलं आहे. त्याचसोबत खत विक्रीच्या नोंदी तत्काळ आणि अचूक पद्धतीनं होण्यासाठी 'ई-पॉस'मधील साठा आणि प्रत्यक्ष साठा समान

असणं गरजेचं आहे. याकरिता विक्रीची नोंद ‘आयएफएमएस’ या प्रणालीमध्ये घेणं बंधनकारक असून क्षेत्रीय स्तरावरील खत निरीक्षकांना याची नियमित तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. ‘ई-पॉस’वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठा यामध्ये फरक आढळल्यास् संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करून परवाना रद्द करण्याचे अधिकार अधिकाऱ्यांना देण्यात आले असल्याचं पुणे कृषी संचालक अशोक किरनळ्ळी यांनी सांगितलं.

## पूर

पुणे महापालिका पूरनियंत्रण सीमाभिंतीच्या कामासाठी 200 कोटींची एकच निविदा काढणार आहे. त्यासाठीची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पुणे शहरातील पूरस्थिती नियंत्रणासाठी नाले आणि आंबील ओढा सीमाभिंती उभारणं या कामासाठी राज्य सरकारनं 200 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. यानंतर आंबील ओढा सीमाभिंत बांधण्यासाठी राज्य सरकारनं 2023 पासून आतापर्यंत 29 कोटींचा निधी मंजूर करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला. मात्र, जिल्हाधिकारी कार्यालय आणि पुणे महापालिका यांच्यात समन्वय नसल्यानं हा निधी पडून राहिल्याची बाब समोर आल्यानंतर ही निविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

## मूर्ती

पुणे महापालिकेसह चार संस्थांनी आयोजित केलेल्या बाल गणेश कोथरूड उत्सवाच्या अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांनी आकर्षक पर्यावरणपूरक

गणेशमूर्ती साकारल्या. कोथरूडमधील छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय 47 मुलींची शाळा इथं आज झालेल्या कार्यशाळेत 200 विद्यार्थ्यांनी श्रीगणेशाच्या मूर्ती साकारल्या. गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याची घोषणा केल्यानंतर गणेशमूर्ती साकारण्याची ही पहिलीच कार्यशाळा ठरली. ज्येष्ठ चित्रकार मुरली लाहोटी यांच्या हस्ते कार्यशाळेचं उद्घाटन झालं. शिल्पकार विजय राऊत, विजय दीक्षित यांनी यासाठी मार्गदर्शन केलं.

**गोबं**

बालरूपातील गणेशमूर्तीपासून ते थेट तांत्रिक मार्गातील कुंडलिनी गणेशापर्यंतचा गणेशमूर्तींचा प्रवास ज्येष्ठ मूर्तिशास्त्र तज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या कथनातून उलगडला. ते आज पुण्यातील इंडी हेरीटेज आणि बेलवलकर सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित ‘मास्टर क्लास’ उपक्रमांतर्गत ‘गणेश मूर्ति’ या विषयवार आयोजित व्याख्यानात बोलत होते. डॉ. मंजिरी भालेराव, समीर बेलवलकर , तुषार जोशी यावेळी  उपस्थित होते.

**रक्तदान**

लीला पूनावाला फाउंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात 100 हून अधिक जणांनी रक्तदान केलं. दान केलेला रक्ताचा प्रत्येक थेंब हा जीवनाची देणगी आणि गरजूंसाठी आशेचा किरण आहे असल्याची भावना संस्थापक विश्वस्त पूनावाला यांनी व्यक्त केली.

**बंदी**

पिंपरी चिंचवड महापालिकेची मैदाने, उद्याने, मोकळ्या आणि आरक्षित जागांमध्ये अवजड यांत्रिक खेळाची सामग्री तसेच विविध प्रकारच्या मनोरंजनांची साधने लावण्यास महापालिका प्रशासनाच्यावतीने बंदी घालण्यात आली आहे. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयामार्फत संबंधित क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील महापालिकेच्या मोकळ्या तसंच आरक्षित जागा ; भाडेतत्त्वावर देण्याची परवानगी दिली जाते. यामध्ये लावल्या जाणाऱ्या मनोरंजनाच्या यांत्रिक खेळांच्या साधनांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून विविध समस्या निर्माण होत आहेत.

**पुस्तक**

बबनराव पाटील लिखित ‘विठ्ठलवारी आनंद यात्रा’ या पुस्तकाचं प्रकाशन संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉक्टर सदानंद मोरे यांच्या हस्ते आज पुण्यात करण्यात आलं. यावेळी बोलताना डॉक्टर मोरे म्हणाले की पंढरीची वारी ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. संतांच्या अभंगांमुळं मराठी भाषेचा प्रचार होण्यासह ती टिकविण्याचे कार्य वारीच्या माध्यमातून होत आहे. या वारीची अलौकिक परंपरा, सत्यता, महती वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ‘विठ्ठलवारी आनंद यात्रा’ या ग्रंथाचा दस्तावेजासारखा उपयोग होणार आहे.

## उद्यान

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यान वृक्ष संवर्धन विभाग आणि वनराई सामाजिक संघटना यांच्यावतीनं संत कबीर उद्यान परिसरात 'देशी वनस्पती, झुडपं आणि वेली यांचं घनवन' हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत उद्यानामध्ये देशी आणि आयुर्वेदिक झाडांची लागवड केली जाणार आहे. या दुर्मिळ तसंच स्थानिक प्रजातींमुळं पक्षी, प्राणी, कीटक आणि सूक्ष्म जीवांसाठी सुरक्षित नैसर्गिक अधिवास उपलब्ध होणार आहे.

## उशिरा

पुणे महापालिकेत उशिरा कामावर आलेल्या 550 कर्मचाऱ्यांना महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज कारणं दाखवा नोटीस बजावली आहे. शुक्रवारी काल दहा वाजून वीस मिनिटांनी आयुक्तांनी महापालिकेचे दरवाजे बंद करण्याचे आदेश दिले. यावेळी साडेपाचशे कर्मचारी उशिरा कामावर आल्याचं निदर्शनास आलं होतं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**